bluebytes
news that matters

पुढारी

Tuesday, March 16, 2010

**Healis point out government**

Publication: Pudhari, Edition: Mumbai, Journalist: Bureau, Page No: IV, Location: Bottom-Left, Width(cms): 6, Height(cms): 10, Size(sq.cms): 60

# हेलिसची सरकारवर टीका

**मुंबई :** हेलिस सेखसरिया इन्स्टिट्यूट फॉर पब्लिक हेल्थ या संस्थेने सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सुधारण्याकरता वाहून घेतले असून त्याकरता तंबाकूसंदर्भात विशेष संशोधन केले जात आहे. २०१० च्या अर्थसंकल्पात केंद्र सरकारने सिगारेट, सिगार आणि सिगाररिलोस यावरील करात ११ ते १८ टक्के वाढ केली असली तरी विड्यांवर कर लादलेला नाही. याचाच अर्थ विडी उत्पादकांना सरकार झुकते माप देत असल्याची टीका या संस्थेने केली आहे.

हेलिस सेखसारिया इन्स्टिट्यूट फॉर पब्लिक हेल्थचे संचालक डॉ. प्रकाश सी. गुप्ता म्हणाले, ''भारतात जगातील एकूण ८५ टक्के विडी उत्पादन होते. दरवर्षी आपल्या देशात जवळपास अब्जावधी विड्यांचे उत्पादन होते. विड्यांवरील करात दर विडीमागे १ पैसा एवढी जरी वाढ केली तरी त्यामुळे सरकारकडे जमा होणाऱ्या महसुलात १००० कोटी रु.ची वाढ होईल. त्याचबरोबर विड्या महागल्यामुळे लोकांचे विडी ओढण्याचे प्रमाण कमी होईल.